REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३१ मे, १९४४ अंक २२

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॅश, टोमॅटो सॉस, मॅंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅबिलस् टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:—
माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

| दत्त कंपनी |
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेळेवर रिपेअर करून मिळतील.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

## विविध माहिती

### नाशीक शहरांत गुमास्ता कायदा

गुमास्ता कायद्याची नाशीक शहरांत अंमलबजावणी १ जूनपासून सुरू होईल, असें सरकारनें जाहीर केलें आहे. नाशीक म्युनिसिपॅलिटीच्या हद्दींत तो कायदा लागू करण्यांत येईल.

### ट्रेझरी बिलांवर ६ आ. १० पै व्याज

हिंदुस्थान सरकारचीं ४ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत टेंडरें मागवून विकण्यांत आलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ६ आणे १० पै इतका पडला.

### म्हैसूर सरकारचें १९४४-४५ चें अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | ... | ८ कोटि रुपये |
| खर्च | ... | ७ कोटि, ९८ लक्ष रुपये |
| वाढावा | ... | २ लक्ष रुपये |

बंगलोर शहराच्या इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या योजनेकरितां बजेटांत मोठी तरतूद केलेली आहे.

### सुपरव्हिजन बोर्डांची मुदतवाढ

सहकारी सोसायट्यांच्या प्रांतिक सुपरव्हिजन बोर्डांत रजिस्ट्रार ( अध्यक्ष ), श्री. आर. जी. सरय्या व श्री. बी. व्ही. जाधव हे तिघेजण आहेत. बोर्डाची मुदत २९ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

### ९०% शहरी जनता रेशनिंगखालीं येणार

मुंबई प्रांतांत शहरांतून रेशनिंग सुरू करण्याची योजना पुरी झाली, म्हणजे शेकडा ९० शहरी लोक तिच्या अमलाखालीं येऊन ५० लक्ष लोकांस वाटप पद्धतीनें धान्य मिळूं लागेल.

### चीनला युद्धसामुग्रीचा पुरवठा

सध्याच्या कर्ज-उसनवार पद्धतीनें अमेरिका रशियाकडे पुष्कळ युद्धसाहित्य पाठवीत आहे. युरोपांतील युद्ध संपल्यावर, हें साहित्य रशियानें अमेरिकेस परत करावयाचें आहे. इतक्या दूर तें पाठविण्यापेक्षा चीनमधील संयुक्त राष्ट्रांच्या केंद्रांकडे तें धाडणें सोईचें होईल व असें करण्यांत रशिया-जपान तटस्थता कराराचा भंग होणार नाहीं, असें अमेरिकेंत मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

### अमेरिकन व ब्रिटिश नागरिकांचें अन्न

अमेरिकन नागरिकाचे मानानें ब्रिटिश नागरिकास सध्या फक्त ७६% दूध, ७६% मांस, ६८% कोंबड्या व मासे, आणि ५६% अंडीं एवढेंच अन्न मिळतें. ग्रेट ब्रिटनमध्यें मिळणारीं अंडीं वाळवलेल्या पुडीच्या स्वरूपांतच मुख्यतः असतात.

### मुंबई प्रांतांतील औद्योगिक वांधे

मुंबई प्रांतांत फेब्रुवारी १९४४ मध्यें २५ औद्योगिक वांधे झाले, त्यांत ११,०५२ कामगारांचे कामाचे १९,३२७ दिवस बुडाले.

### ८ जून रोजीं सुटी नाहीं

बादशहांचा वाढदिवस कोणत्या दिवशीं साजरा करावयाचा हें दरवर्षी ठरविलें जातें. ८ जून रोजीं ह्या वाढदिवसानिमित्त सुटी जाहीर करण्यांत आली होती. परंतु ह्या वेळीं कोणतेहि समारंभ होऊं नयेत अशी इच्छा बादशहांनीं व्यक्त केली आहे. त्या दिवशीची सुटी रद्द करण्यांत आली आहे.

### हिंदुस्थान अमेरिकेचें मिन्हाईक बनणार

"राजकीय घडामोडींमुळें हिंदी बाजारपेठेवरील ब्रिटिश पकड कमी झाली आहे व ब्रिटिश कारखानदार आणि अधिकारी ह्यांचेसंबंधीं प्रतिकूल मत झाल्यामुळें जुने व्यापारी संबंध दुरावले जात आहेत. बिगर-ब्रिटिश कंपन्यांचें प्रतिनिधित्व स्वीकारण्यास हिंदी व्यापारी तयार आहेत, इतकेंच नव्हे तर ते उत्सुक आहेत. ब्रिटिश व्यापारी व कारखानदार ह्यांचेकडून आजवर यंत्रसामुग्री व माल घेणाऱ्या हिंदी कारखानदारास बदल मिळाला तर हवा आहे. परराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें हिंदुस्थान आजवर महत्त्वाचा नसला, तर ह्यापुढें अमेरिकन मालाची मोठ्या प्रमाणावर तो खरेदी करील, असा रंग दिसतो.":-अमेरिकेंतील हिंदी व्यापारी प्रतिनिधि, मि. अहमद ह्यांचें न्यूयॉर्कमध्यें भाषण.

### ऑस्ट्रेलियानें पाठविलेला गहू व कणीक

२२ मे, १९४४ अखेर संपलेल्या बारा महिन्यांत ऑस्ट्रेलियानें हिंदुस्थानकडे २,९५,००० टन गहू व ३६,००० टन कणीक ह्यांची निर्गत केली.

### अन्नाची महागाई कमी होत चालली?

हिंदुस्थान सरकारचे अन्न महागाई निदर्शक ताजे आकडे अन्नाची महागाई कमी झाल्याचें दर्शवितातः—

| | |
|---|---|
| २६ ऑगस्ट १९३९ | १०० |
| एप्रिल, १९४४ ची सरासरी | २३३·७ |
| ६ मे, १९४४ | २३१·४ |
| १३, १९४४ | २२५·७ |

चणा, चहा व गूळ ह्यांची किंमत घटली त्यामुळें ६ ते १३ मे ह्या मुदतींत महागाई निदर्शक आकडा खालीं गेला.

### बँक ऑफ इंग्लंडचें २५० वें डिव्हिडंड

बँक ऑफ इंग्लंडनें २५ मार्च, १६९५ रोजीं आपलें पहिलें सहामाही डिव्हिडंड जाहीर केलें. २३ मार्च, १९४४ रोजीं बँकेनें आपलें ५०० वें सहामाही डिव्हिडंड जाहीर केलें! ह्या दोन्ही वेळचें डिव्हिडंड ६% च असलें तर त्याचा दर नक्याप्रमाणें वेळोवेळ बदलत आलेला आहे. गेल्या महायुद्धापासून बँकेचा कारभार मुख्यतः सरकारी ट्रेझरीचें काम, कर्जाची व्यवस्था, नोटा काढणें, सरकारची व इतर बँकांची प्रमुख बँक म्हणून काम करणें, इत्यादि स्वरुपाचाच आहे व तेव्हांपासून डिव्हिडंडचा दर ६% ( वजा कर ) असाच राहिलेला आहे. हा दर कायम राहील, त्यांत बदल होणार नाहीं, हें सर्वजण गृहीत धरूनच चालतात, त्यामुळें बिनमुदती सरकारी रोख्यांचेंच बँकेच्या भागांस स्वरूप प्राप्त झालें आहे. बँकेच्या भागीदारांची संख्या १७ हजार आहे व त्यांपैकीं १० हजारांजवळील भाग एकूण ५०० पौंडांपेक्षां कमी रकमेचे आहेत. बँकेस लवकरच २५० वर्षे पुरीं होतील.

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

( १२ मे, १९४४ चे आकडे )

रिझर्व्ह बँकेच्या एकूण ९१० कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा प्रसारांत असून ११ कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा बँकेच्या बँकिंग खात्यांत आहेत. त्यांस तारण ४४ कोटि ४१½ लक्ष रुपयांचें सोनें, ८०५ कोटि रुपयांचे स्टर्लिंग रोखे, ५८ कोटि, ३३ लक्ष रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे रोखे व १३ कोटि, ६५ लक्ष रुपयांचीं नाणीं हीं आहेत.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७० | व्यवस्था-पैशाची वर्गवारी | |
| २ सेंट्रल आणि अर्बन बँका | १७१ | ७ "बचत करा" मोहीम | १७४ |
| ३ रासायनिक खतांचें उत्पादन ... | १७२ | ८ तरुणांचे विवाह व अपत्यें | १७४ |
| ४ शेअर बाजार ... | १७२ | ९ मधमाशा पाळण्याचा धंदा | १७४ |
| ५ सहकार व यात्रेकरूंची सोय | १७२ | १० सर ज. मदन ह्यांची भेट | १७५ |
| ६ स्फुट विचार ... | १७३ | ११ शेंगा विक्रीस मार्केट ॲक्ट ... | १७५ |
| कापडाच्या चोर बाजारावर मोहीम-सहकारी संघटनाचा उपयोग-आंतर राष्ट्रीय चलन | | १२ इन्स्टिट्यूटच्या चेअरमनची भेट ... ... | १७६ |
| | | १३ लॉटरी कर्जें ... | १७६ |



# अर्थ

बुधवार, ता. ३१ मे, १९४४


## सेंट्रल आणि अर्बन बँका ह्यांचे परस्पर संबंध

### सरकारचा महत्त्वाचा निर्णय

वैयक्तिक स्पर्धेच्या रगाड्यामध्यें आर्थिक बाबतींत दुर्बल असणाऱ्या लोकांचा टिकाव लागत नाहीं आणि ते बहुसंख्य व कष्टाळू असले तरी त्यांस असल्या झगड्यांत हार खावी लागते. सहकारी संघटन हा ह्या प्रकारच्या दुर्बलांच्या असाहृयतेवर योजण्यांत येणारा यशस्वी तोडगा आहे. तथापि सहकारी संघटनांत श्रमविभागाच्या तत्त्वानुसार निरनिराळे घटक असतात आणि कांहीं बाबतींत त्यांचेमध्येंहि स्पर्धा उत्पन्न होते आणि त्यांचें घर्षण जाचक होऊं लागतें. ह्या परिस्थितीवरचा उत्कृष्ट उपाय सहकारी तडजोड हाच आहे हें उघड आहे. उत्पादन, विक्री, खरेदी, कर्जें देणें व कर्जें घेणें इत्यादि अनेकविध आर्थिक व्यवहार कारभाराच्या सोयीसाठी स्वतंत्र रीतीनें निरनिराळ्या सहकारी संस्थांस चालवावे लागतात आणि त्यांमध्यें हितसंबंध परस्परविरोधी आहेत असें दिसून येतें. उदाहरणार्थ, उत्पादनास वाहिलेल्या संस्थांस आपल्या मालाच्या अधिकांत अधिक किंमती मिळाव्या असें वाटतें तर तो माल खरेदी करणारांस त्याची स्वस्ताई इष्ट असते. त्याचप्रमाणें, कर्ज घेणारी सोसायटी आणि तें देणारी बँक यांचेमध्यें व्याजाचे दराचे बाबतींत विरोध आहे असें दिसतें. अशा परस्पर विरोधी भासणाऱ्या व्यवहारांत अखेर "जगा आणि जगवा" ह्या तत्त्वाचा आश्रय करावा लागतो आणि विरोधी अपेक्षांच्या तडजोडीनें मेळ घालावा लागतो. अल्प प्राप्तीच्या लोकांनीं स्वतःच्या सोयीसाठी सहकारी संस्था चालवलेल्या असल्याकारणानें सर्वांचेंच अधिकांत अधिक हित होईल अशा रीतीनें परस्परांच्या व्यवहारांचे संबंध निश्चित करावयाचे असतात. सहकारी संघटनांतल्या अंतिम सत्ताधाऱ्यांनीं ह्या तऱ्हेच्या तडजोडीस उत्तेजन आणि मान्यता दिली पाहिजे.

एकाच क्षेत्रांत काम करणाऱ्या दोन निरनिराळ्या सहकारी संस्थांमध्यें उत्पन्न होणाऱ्या विरोधाचें एक ठळक उदाहरण म्हणून जिल्हा सेंट्रल बँका आणि अर्बन बँका ह्यांच्यामधील मतभेदाकडे बोट दाखवतां येईल. सेंट्रल बँकेचें कार्यक्षेत्र सबंद जिल्हा हें असतें आणि तिला तालुक्याच्या व इतर लहानमोठ्या गावांत भांडवल व ठेवी जमा करतां येतात. तिच्या भांडवलाचा व्याप मोठा असतो आणि शेकडो शेतीपेढ्यांस कर्जें देण्याचा व्यवहार करतां येऊन नफ्याचें साधन तिच्या हातीं असतें. तथापि, ह्या व्यवहारामुळें कर्जाच्या सुरक्षितपणाचे बाबतींत तिच्यावर जबाबदारीहि मोठी असते. पैशाच्या सौकर्यामुळें अर्बन बँका व इतर सहकारी संस्था ह्यांची ती मध्यवर्ती बँक बनते. शेतीचा धंदा अनिश्चित असतो म्हणून सेंट्रल बँकेचीं प्राथमिक सोसायट्यांकडून येणारीं कर्जें थकतात आणि बुडतात. एवढ्यासाठी तिचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालणें आवश्यक होतें. व्यक्तींस कर्ज देणें ह्या वर्गातील बँकेच्या क्षेत्रांत येत नाहीं. तरीहि युद्धापूर्वीच्या मंदीच्या दिवसांत हे व्यवहार विशिष्ट मर्यादेंत करण्याची मुभा तिला देण्यांत आली आणि वाढलेल्या ठेवींचा किफायतशीर विनियोग करतां यावा म्हणून ही सवलत युद्धपरिस्थितींतहि चालू ठेवण्यांत आली आहे.

खेडेगावी म्हणजे शेतकरी लोकांचेसाठी कर्जाचे वगैरे व्यवहार सेंट्रल बँक सबंध जिल्हाभर करते. त्याच क्षेत्रांत शहरी विभागांत मध्यम स्थितींतली जनता, कारागीर व लहानसहान व्यापारी ह्यांचेकरितां अर्बन बँका काम करतात. ह्या दोन प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद, त्यांच्या गरजा व त्यांचे व्यवहार स्वभावतःच भिन्न रीतींचे असतात. त्यांच्या पैशाचा उगम व उपयोग ठरलेल्या मर्यादेंत असतो. सेंट्रल व अर्बन बँका ह्यांचीं कार्यक्षेत्रें स्पष्टपणें विभागलेलीं असतात तरी त्यांच्या मर्यादा कांहीं बाबतींत परस्परांवर घासतात आणि त्यांच्या घर्षणानें विरोध उत्पन्न होतो. ठेवींवरील व्याजाचे दरांत सेंट्रल बँकेस अर्बन बँकांपेक्षां कमी व्याजानें ठेवी मिळतात आणि व्यक्तींस मालाचे तारणावर तिनें कर्जें दिलीं असतां अर्बन बँकांच्या राखीव कामांत तिनें हस्तक्षेप केल्यासारखें होतें. अर्बन बँक लहान प्रमाणावर चालते आणि तिला सेंट्रल बँकेची स्पर्धा सहन करण्याचें सामर्थ्य नसतें. व्यक्तींस मालाचे तारणावर कर्जें देणें, हुंड्या खरेदिणें व विकणें इत्यादि बाबतींत शहरी क्षेत्रांत सेंट्रल बँकेनें पडूं नये असें त्यांचें म्हणणें पडतें. शहरी बँका हें सहकारी संघटनेचें एक महत्त्वाचें अंग असल्यानें त्यांस अन्याय होईल किंवा त्यांच्या स्वत्वाशुन्या हितास बाध येईल असें कोणतेंहि धोरण सेंट्रल बँकेनें आंगिकारूं नये असें त्यांचें म्हणणें असतें. सेंट्रल बँक आणि अर्बन बँका ह्यांचीं कार्यक्षेत्रें आखून दिलीं गेल्यानंतर त्यांचेमध्यें स्पर्धा उत्पन्न होऊं नये म्हणून वादविषयक प्रश्नांवर तडजोड करण्याचा प्रघात आहे आणि आतांपर्यंत तोच मान्य करण्यांत आलेला आहे. भनसाळी-मेथा रिपोर्टांत ह्या धोरणाचा पुरस्कार केलेला आहे आणि प्रॉव्हिन्शियल बँक्स असोशिएशनच्या सभांत व परिषदांत त्यास पाठिंबा देण्यांत आला आहे. पांच वर्षांमागें भनसाळी-मेथा रिपोर्टांतील प्रस्तुतविषयक सूचनेस मुंबई सरकारनें स्पष्ट मान्यता दिली होती. ही सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेतां बँक्स असोशिएशनशीं विचारविनिमय न करतां सरकारनें वरील तडजोडीचें धोरण सोडून दिलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे ह्याचें आश्चर्य वाटतें. कांहीं जिल्ह्यांत सेंट्रल बँक व अर्बन बँक्स ह्यांचेमध्यें त्यांचे व्यवहार-मर्यादांचे बाबतींत तीव्र मतभेद उत्पन्न झाले होते आणि त्यांचा विचार असोशिएशन करीत होती. दरम्यान सरकारचा निर्णय प्रसिद्ध झाल्यानें सेंट्रल बँकांच्या प्रतिनिधींची सभा गेल्या आठवड्यांत भरली होती तीमध्यें सरकारच्या प्रस्तुत

धोरणाविषयीं आश्चर्य व नापसंती व्यक्त करण्यांत आली. सरकारचा निर्णय सेंट्रल बँकांस अनुकूल असून अर्बन बँकांशीं तडजोड करण्याच्या आवश्यकतेपासून त्यांस मुक्त करण्यांत आलें आहे. तथापि, असोसिएशनचें मत न घेतां एक-दोन ठिकाणच्या तंटयावरून सरकारनें आपलें सर्वमान्य धोरण सर्वच बदललें आहे हें कोणासहि पसंत नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ह्या सर्व प्रश्नाविषयीं खुलासा करण्याची आणि त्याची चर्चा करण्याची विनंति रजिस्ट्रार ह्यांस करण्याचें असोसिएशननें ठरविलें आहे. त्यांनीं प्रस्तुत बाबतींत निष्कारण भलती घाई केली आहे ह्यांत शंका नाहीं.

---

## हिंदुस्थानांत रासायनिक खतांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन

( सर रामस्वामी मुदलियारकृत सरकारी योजनेचें स्पष्टीकरण. )

" हिंदुस्थानांत दरसाल ३,६०,००० टन अमोनियम सल्फेटचें उत्पादन करण्याची, ९ कोटि भांडवली खर्चाची योजना हिंदुस्थान सरकार आखीत आहे. त्यासंबंधांत सल्ला देण्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञांना बोलावण्यांत येणार आहे, त्यांच्या भाड्याचा व रहाण्याचा खर्च हिंदुस्थान सरकार करणार आहे. ब्रिटिश तज्ज्ञ येथें आले, ह्यांचा ग्रेट ब्रिटनमध्येंच यंत्रसामुग्रीची खरेदी केली जाईल, असा अर्थ काढण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थान सरकारचे हिंदी व युरोपियन तज्ज्ञ ब्रिटिश तज्ज्ञांच्या चौकशीचे कामांत भाग घेतील. कल्पनेप्रमाणें योजना पुरी झाली, तर १९४६ च्या मध्याचे सुमारास अमोनियम सल्फेट व इतर खतें बाजारांत येऊं शकतील. हिंदुस्थानांत दरवर्षी २० लक्ष टन रासायनिक खतांचा खप होण्यास वाव आहे. धान्याचें उत्पादन तातडीनें वाढविणें आणि जमिनीच्या वाढत्या निकृष्टपणास आळा घालणें हें अगत्याचें झालें आहे. तेव्हां, खतांचें केवळ उत्पादन वाढवून भागणार नाहीं; त्यांचा सर्रास उपयोग केला जाईल अशी व्यवस्था व प्रचार ह्यांचीहि आवश्यकता आहे. सध्या फक्त चहा, कॉफी, साखर व रबर ह्यांच्या मळ्यांतच ह्या खतांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. लहान शेतकऱ्यांच्याहि आवाक्यांत त्याचा वापर यावा, ह्याकरितां तकावी कर्जाच्या प्रकारानें त्यांस हीं खतें देणें जरूर पडेल. प्रत्येक प्रांतासाठी एक स्वतंत्र खतांचा कारखाना काढावा, किंवा सबंद हिंदुस्थानासाठी एकच प्रचंड कारखाना स्थापून त्यांत प्रांतांस वाटा मिळावा, असें प्रांतिक सरकारांचें म्हणणें आहे. "

---

## आरोग्य रक्षणावर म्युनिसिपालिट्यांचा खर्च

मुंबई शहरांतील कांहीं प्रमुख म्युनिसिपालिट्यांचें दरमाणशीं उत्पन्न व त्यांचा दरमाणशीं सार्वजनिक आरोग्य रक्षणावरील खर्च ह्यांचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

| | दर माणशीं उत्पन्न | आरोग्यावर दर माणशीं खर्च |
|---|---|---|
| मुंबई शहर | रु. २४-११-२ | रु. ६-१२-० |
| अहमदाबाद | रु. ९-२-५ | रु. ३-११-११ |
| पुणें | रु. ९-१४-९ | रु. ३-०-७ |
| सुरत | रु. ७-१२-७ | रु. २-१३-७ |
| सोलापूर | रु. ६-७-६ | रु. २-१५-४ |

## शेअर बाजार

( लेखक:—श्री. व वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

गिरण्यांच्या शेअर्सची मंदी अजून चालूच आहे. या मंदींत एक गोष्ट विशेष दिसून आली ती ही कीं, एकदम सगळे शेअर्स न पडतां आज एक, उद्यां दुसरा अशा रीतीनें ते पाडण्यांत येत आहेत. परवा इंदूर माळवा दोन दिवसांत ११६० वरून ९४५ पर्यंत कोळशाच्या तुटवड्याच्या मुमकेवर पाडण्यांत आला. या शेअरमध्यें इंदूर-मुंबईचे प्रख्यात सटोडियांचे खेळ चालू असतात हें विश्रुत आहे. त्यावरून निष्कर्ष निघतो कीं बाजारांत मुकाट्यानें किल्ल्यांची फिरवाफिरव चालू आहे. नाहींतर एकीकडे एकाच बाजारांत टाटा डिफर्ड ऑर्डिनरी वर जात आहेत तर लागोपाठ गिरण्या खालीं येत आहेत असा देखावा दिसला नसता. बाजारांत तेजी किंवा मंदी ही सर्वसाधारण असतात असा नियम आहे. तसेंच चालू बाजारांत केव्हांहि अजून मोठ्या प्रमाणांत घबराट व पळापळ दिसून आलेली नाहींत. खरा गडगडाट येतो तेव्हां नाखुष बाजाराच्या अंगावर वाटेल त्या किंमतींत शेअरचे गठ्ठेच्या गठ्ठे फेंकण्यांत येतात व रसातळाला भाव नेण्यांत येतात अशी परिस्थिति केव्हांच दिसून आलेली नाहीं. तेव्हां या मंद बाजारांत धंदेवाईकांचें मुकाट्यानें माळाचें शोषण चालू आहे असा फार संशय येतो. निरनिराळे बागुलबुवे उभे करून बाजार चढूं न देतां अशा प्रकारें माल पुष्कळदां गोळा केला जात असतो व एकाद्या धबाड मुहूर्तावर स्प्रिंग सुटल्याप्रमाणें भाव वर चढविण्यांत येतात. सुमारें एक महिन्यांतच हें व्हावें असा अंदाज आहे.

ज्या गिरण्यांचा माल वाटपाकरितां सरकारनें ताब्यांत घेतला आहे त्यांच्या भागीदारांनीं गडबडण्याचें मुळींच कारण नाहीं. या प्रकरणावरून येवढेंच म्हणतां येईल कीं हिंदी धंद्यांत अप्रामाणिकपणा खुशाल धुडगूस घालत आहे व तो नवीन नाहीं. गिरण्यांचे चालक भागीदारांना उडवून लावतां येत नाहींत हीच खेदाची गोष्ट आहे.

---

## सहकार व यात्रेकरूंची सोय

कळवण तालुक्यांत कळवणजवळ दहा मैलांवर सप्तशृंग नांवाचा गड आहे. त्या गडावरील सप्तशृंगी देवींची मोठी यात्रा दरसाल चैत्र शुद्ध पौर्णिमेस भरत असते. त्या यात्रेंत दरसाल सुमारें ५०,००० यात्रेकरू येत असतात. सध्याच्या सरकारच्या धान्यनियंत्रणाच्या धोरणानुसार यंदाचे वर्षी यात्रेस येणाऱ्या भाविक यात्रेकरूंना, मे. मामलेदारसाहेब ता. कळवण यांच्या संमतीनें कळवण येथील सहकारी संस्था कळवण तालुका खरेदी-विक्री संघ लि. कळवण या संस्थेनें धान्य वांटण्याची सोय केलेली होती. सदर सहकारी संस्थेनें यात्रेकरूंच्या मार्गावर देवळें, कळवण, नांदुरी व सप्तशृंग गड या चार ठिकाणीं धान्याचीं दुकानें उघडलीं होतीं. त्या दुकानांमध्यें बाजरीचें पीठ, गव्हाचें पीठ, हरबऱ्याचें पीठ, तांदूळ, नागली, खडीसाखर, खारक्या, रॉकेल व सोबऱ्याचें तेल या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यांत आल्या होत्या. प्रत्येक यात्रेकरूची खाण्यापिण्याची व दिवाबत्तीची उत्तम प्रकारें सोय करण्यांत आली होती. दुकानांचें कामकाज व तसेंच एकंदर यात्रेकरूंची झालेली दिवाबत्तीची व खाण्यापिण्याची सुंदर व्यवस्था पाहून श्री. सोनटक्के, मे. डेप्युटी कलेक्टर, मालेगांव व श्री. अग्निहोत्री मे. मामलेदार कळवण व श्री. दंडवते मे. पोलीस सब्-इन्स्पेक्टर कळवण यांनीं समाधान व्यक्त केलें व सहकारी दुकानानें करून दाखविलेल्या कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढले. यात्रेकरूंची उत्तम सोय झाल्यानें यात्रेकरूंनींहि सहकारी दुकानास शुभाशीर्वाद दिला. अशा तऱ्हेचे सर्व सहकारी संस्थांनीं आलेल्या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन स्वार्थाबरोबरच परमार्थ साधावा.

# स्फुट विचार

### कापडाच्या चोरबाजारावर मोहीम

कापडाचा पुरवठा वाढवून त्याच्या किंमती उतरवण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे, तो यशस्वी होण्यास कापडगिरण्या व व्यापारी ह्यांचें हार्दिक सहाय आवश्यक आहे हें उघड आहे. कापड उघड विक्रीस न काढतां तें दाबून ठेवावयाचें आणि भरमसाट किंमतीनें चोरबाजारांत विकावयाचें असा प्रघात कांहीं व्यापाऱ्यांनीं व गिरणीवाल्यांनीं पाडल्यामुळें त्यांचेविरुद्ध कडक उपायांची योजना सरकार अंमलांत आणीत आहे हें जनतेच्या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. कापडाचे चोरटे साठे शोधून काढून ते बाजारांत आणण्याची आणि त्यांच्या मालकांस शिक्षा देण्याची खटपट आतांपर्यंत चाललीच होती. तथापि, कापडाची कृत्रिम महागाई अजूनहि लोकांस जाचक होत आहे आणि देशांत तयार होणारें सर्व कापड उघड्या बाजारांत येणें अगत्याचें आहे. ह्या कामीं सरकारशीं सहकार्य न करणाऱ्या धंदेवाल्यांच्या कारवाया बंद पाडण्याचा निर्धार सरकारनें केला आहे. कांहीं गिरण्या त्यानें आपल्या ताब्यांत घेऊन त्या चालविण्याची व्यवस्था केली आहे. विशिष्ट गिरण्यांचा माल ठरवलेल्या बाजारांत विकला जाण्याची तजवीजहि त्यानें केली आहे. गिरण्यांचा कारभार स्वतःचे नियंत्रणासाठीं सरकारनें आणण्याचें धोरण विलक्षण कडकपणाचें असलें तरी असाध्य रोगावर जालीम उपाय योजणें आवश्यक असतें ह्या नियमास अनुसरूनच प्रस्तुत बाबतींत सरकार वागत आहे. कांहीं कारखानदारांच्या व व्यापाऱ्यांच्या भरमसाट नफेबाजीमुळें सामान्य लोकांचे किती हाल होतात ह्याची त्या धंदेवाल्यांस पर्वा नाहीं. अशा स्थितींत चोरबाजार बंद करण्याच्या कडक उपायांस सामान्य जनतेचा पाठिंबा मिळेल.

---

### सहकारी संघटनाचा पूर्ण उपयोग करा

धान्याच्या उत्पादनाचे वाढीसाठीं हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकार आपापल्या परीनें शिकस्तीचे यत्न करीत आहेत. " अधिक धान्य पिकवा " ह्या घोषणेचा ह्या कामीं थोडाबहुत उपयोग झाला असला तरी बिगरधान्याच्या पिकांखालील क्षेत्रांत अपेक्षेप्रमाणें घट झालेली नाहीं असें सबंद देशाच्या परिस्थितीकडे पहातां दिसून येतें. शांततेच्या काळीं सामान्यतः धान्याचे संबंधांत हा देश स्वयंपूर्ण आहे असें मानण्यांत येतें; तथापि ह्याचा अर्थ धान्याची आयात किंवा निर्गत म्हणण्यासारखी होत नाहीं एवढाच घ्यावयाचा आहे. जनतेच्या समाधानकारक रहाणीस आवश्यक असलेलें सर्व धान्य ह्या देशांत तयार होतें असें त्यावरून समजणें चुकीचें आहे. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या योजनांमध्यें शेतीच्या उत्पादनाचे विस्ताराचा अंतर्भाव करण्यांत येत आहे तो ह्याकरितांच आहे. देशी उद्योगधंद्यांसाठीं कच्चा माल लागतो तो हिंदुस्थानांतील जमिनीनें ह्यापुढें पुरवावा लागेल आणि विशिष्ट जातींच्या शेतीच्या मालास परदेशांत मागणी असेल, तोहि येथें उत्पन्न करावा लागेल. हें सगळें उत्पादन जमीनदार व शेतकरी ह्यांच्या सोयीवर व इच्छेवर सोपवून काम भागणार नाहीं असें अलीकडच्या अनुभवावरून स्पष्ट झालें आहे आणि सरकारच्या विद्यमानें व सहायानेंच योजनात्मक धोरण अंगीकारावें लागणार आहे. ह्या धोरणाची अंमलबजावणी शक्य तितकी सहकारी संघटनाच्या पद्धतीनें झाल्यास शेतकऱ्यांस व सबंद राष्ट्रास तें सोयीचें व सुखाचें होईल आणि आर्थिक योजना फलद्रूप होण्यास सहाय मिळेल. युद्धपरिस्थितींत सहकारी संघटनाची उपयुक्तता निदर्शनास आली आहे आणि येत आहे. ह्या अनुभवाचा फायदा युद्धोत्तर आर्थिक संवर्धनांत करून घेणें आवश्यक आहे.

---

### लॉर्डांच्या सभेंत आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेविषयीं अमेरिकेंत वाटाघाटी व्हावयाच्या आहेत आणि त्यासंबंधांत सर्वमान्य अशी योजना आंखली जावयाची आहे. तिची सामान्य स्वरूपाची चर्चा नुकतीच ब्रिटिश हाऊस ऑफ लॉर्डसमध्यें झाली. ह्या योजनेच्या बनावटींत इंग्लंडचे वतीनें प्रामुख्यानें भाग घेणारे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, लॉर्ड केन्स ह्यांनीं सदरहु चर्चेत स्पष्टीकरणार्थ आपलें धोरण विशद करून पुढें मांडलें. युद्धोत्तर काळांत पुनर्घटनेचे अवघड आर्थिक प्रश्न उत्पन्न होतील तेव्हां इंग्लंडच्या व्यापाराचें व उद्योगधंद्यांचें तारूं सुरळीतपणानें वावरूं शकेल अशा बेतानेंच नियोजित आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था आंखली जात असल्याचें आश्वासन त्यांनीं दिलें. लंडनमध्यें तीन चार हजार कोटि रुपयांच्या हिंदुस्थान व इतर बाहेरील देश ह्यांच्या मालकीच्या शिलका साचतील त्या परत करण्याची अवघड जबाबदारी ब्रिटिश चलनव्यवस्थेवर पडेल, ती आम्ही आमच्या सोईस जमेल त्याप्रमाणें पार पाडूं असें त्यांनीं सांगितलें. पौंड स्टर्लिंगचा दुसऱ्या देशांच्या चलनांतला दर जरूरीप्रमाणें कमी ज्यास्त करण्याची आणि ब्रिटिश चलनाचे सध्याचे संबंध कायम राखण्याची सवड नियोजित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेंत राहील असेंहि ते म्हणाले. हिंदुस्थानच्या लंडनमधील पैशाचा विनियोग मुख्यत्वेंकरून ब्रिटिश माल खरेदी करण्याकडे करावा लागेल असें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांनींहि नुकतेंच सांगितलें. यंत्रसामुग्रीबरोबर नेहमींच्या वापराचे जिन्नसहि ह्या देशास इंग्लंडमधून आणावे लागतील. त्यांची स्पर्धा स्वदेशी मालाशीं होणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत यावी लागेल. लॉर्डांच्या सभेंतील चर्चेच्या दृष्टीनें हिंदी चलनपद्धतीचा विचार केला जाणें अगत्याचें आहे. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हितसंबंधांस जपत आहे; हिंदुस्थाननें तेंच केलें पाहिजे.

---

### पैशाच्या वर्गावर्गीबाबत बँकांना सवलती

पैशाच्या वर्गावर्गीबाबत रिझर्व्ह बँकेनें पसंत केलेल्या बिगर शेड्यूल्ड बँकांना दराचे संबंधांत कांहीं सवलती दिलेल्या आहेत. शेड्यूल्ड बँकांना पैशाची वर्गावर्गी करणें फारच स्वस्त पडतें व सामान्य जनता आणि रिझर्व्ह बँकेनें मान्य केलेल्या शेड्यूल्ड बँका ह्यांच्या मधलें स्थान बिगर शेड्यूल्ड बँकांस देण्यांत आलें आहे. उदाहरणार्थ, शेड्यूल्ड बँकांना १० हजार रुपये रिझर्व्ह बँकेच्या मध्यस्तीनें फुकट पाठवतां आले, तर मान्य बिगर शेड्यूल्ड बँकांना १/३२% दरानें पैसे पाठवितात; इतर लोकांना १/१६% दरानें कमिशन भरावें लागतें. सवलत मिळविण्यास पात्र होणाऱ्या शेड्यूल्ड बँका ह्या कंपनी कायद्यासाठीं नोंदलेल्या कंपन्या असल्या पाहिजेत, त्या ब्रिटिश हिंदुस्थानांत कंपनी कायद्यान्वयें बँकिंगचा धंदा करीत असल्या पाहिजेत व त्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह किमान ५० हजार रुपये तरी असलें पाहिजे. रिझर्व्ह बँक प्रांतिक सरकारांच्या सल्यानें बिगर शेड्यूल्ड बँकांचे अर्ज विचारांत घेऊन त्या बँकांस सवलती देण्याविषयीं निर्णय करिते.

## विना सहकार नही उद्धार

## " कर्ज फेडा व भविष्यकाळासाठी अधिक बचत करा " मोहीम

### बचत करा निरंतर । भाग्य येईल तदनंतर ॥

नाशिक जिल्ह्यांत अधिक बचत करा मोहीम ता. १५।५।४४ ते २०।५।४४ पर्यंत मोठ्या उत्साहानें व थडाटीनें पार पाडण्यांत आली. या मोहिमेकरितां एक स्पेशल गाडी (व्हॅन) काढण्यांत आली होती. सदर सेव्ह मोअर व्हॅननें नाशिक जिल्ह्यांतील खालीलप्रमाणें तालुक्याचे ठिकाणीं व इतर प्रमुख केंद्रांवर आपला कार्यक्रम मोठ्या जोमानें साजरा केला व सदर कार्यक्रमास लोकांकडून देखील ठिकठिकाणीं फारच मोठ्या प्रमाणावर हार्दिक पाठिंबा मिळाला. श्री. डब्ल्यू. डी. साळुंके असि. रजिस्ट्रार श्री. को. सो. धुळे विभाग, श्री. एम्. एन्. देसाई ऑडिटर व रीकन्स्ट्रक्शन ऑफिसर को. सो. नाशिक, मे. सिनीयर इन्स्पेक्टर श्री. श्री. एम्.डी. चावडा व मे. एज्युकेशनल सुपरवायझर श्री. डी. आर. वाणी ह्यांनीं वरील मोहिमेंत प्रामुख्यानें भाग घेऊन आठवड्याचें महत्त्व समजावून सांगितलें. आलेले संधीचा पुरेपूर फायदा घेऊन प्रथम कर्जमुक्त व्हा व हातांत खेळत असलेला पैसा महागलेल्या वस्तू खरेदी करण्यांत अनाठायीं खर्च न करतां भविष्यकाळासाठीं तो जोडून ठेवा ही गोष्ट जमलेल्या लोकांना हृदयंगम रीतीनें त्यांनीं पटवून दिली. मे. असि. रजिस्ट्रार सो. को. सो. धुळे विभाग, धुळे, यांनीं सहकारी संस्थांमार्फत सध्याच्या युद्धजन्य परिस्थितींत शेतकऱ्यांना आपला जीवनकलह अत्यंत सुलभ रीतीनें कसा सोडवितां येईल हें सहकार्यांत असलेल्या तत्त्वांचें सुंदर रीतीनें सर्वांना समजेल अशा भाषेंत विवेचन करून समजावून दिलें. त्याचा जनसमूहावर योग्य तोच परिणाम होऊन लोकांनीं अहमहमिकेनें पुढें येऊन सहकारी संस्थांचे शेअर्स विकत घेण्याचीं आश्वासनें दिलीं. सदर 'सेव्ह मोअर वुईकचा' कार्यक्रम योग्य अशा संधीलाच सुरू करण्यांत आल्यानें तो फारच परिणामकारक होऊन अगदीं यशस्वी रीतीनें पार पडला. सदर कार्यक्रमाबरोबरच 'अधिक धान्य पेरा' व सहकारी संस्थांमार्फत वांटणीचें काम यशस्वी करून दाखवून आलेल्या संधीचा सहकारी संस्थांनीं फायदा घ्यावा याबद्दलहि यशस्वी प्रचार केला. ठिकठिकाणीं मे. मामलेदारसो. ह्यांनींही हजर राहून अधिक धान्य पेरा कायदा समजावून सांगितला व सदर व्हॅनचा कार्यक्रम पार पाडण्याचे कामीं सक्रिय मदत केली. निफाड येथें मे. प्रांत सो. बहादुर निफाड भाग व मे. प्रांत सो. बहादूर सिन्नर भाग ह्यांनीं मिटींगिला हजर राहून मे. प्रांतसो. निफाड भाग ह्यांनीं लवकरच अंमलांत येणारा अधिक धान्य पेरा कायदा व त्याबरोबरच रयतेवरील जबाबदारी अत्यंत उद्बोधक रीतीनें समजावून सांगितली.

निफाड, चांदोरी व सिन्नर या ठिकाणच्या मीटिंगांना मे. दि. ब. वंढेकर, डि. ए. ऑ. को. सो. नाशिक यांनीं हजर राहून अध्यक्ष या नात्यानें उपयुक्त असा मौल्यवान् उपदेश केला.

ता. १५।५।४४ दिंडोरी कळवण.
ता. १६।५।४४ देवळे ( ता. कळवण ) सटाणा.
ता. १७।५।४४ लखमापूर, दाभाडी, मालेगांव.
ता. १८।५।४४ नीमगांव, नांदगांव.
ता. १९।५।४४ येवला, निफाड.
ता. २०।५।४४ चांदोरी व सिन्नर.

### इंग्लंडमधील तरुणांचे विवाह व अपत्यें

१९३९ ह्या वर्षानंतरचे रजिस्ट्रार जनरलचे आकडे उपलब्ध नाहींत, परंतु १९३९ च्या आकड्यांवरून असें दिसतें कीं त्या वर्षी इंग्लंड व वेल्समध्यें वीस वर्षांखालील वयाच्या २०,९८१ स्त्रियांना पहिलीं औरस अपत्यें झालीं, त्यांतील १५,४२७ अपत्यें विवाहास आठ महिने पुरे होण्यापूर्वीच झालीं. १४,७८७ अपत्यांचा जन्म विवाहानंतर सात महिन्यांचे आंतच झाला. ह्याचा अर्थ असा, कीं ह्या स्त्रियांपैकीं तीन चतुर्थांश स्त्रिया विवाहापूर्वीच गर्भवती होत्या. कांहीं बाबतींत अगोदर विवाह करण्याचें ठरविलें असणाऱ्या जोडप्यास अपत्यें झालीं असलीं, तरी बहुसंख्य प्रकरणांत गर्भ राहण्यापूर्वी विवाहाचा उद्देश नव्हता, असेंच मानण्यास पुष्कळ जागा आहे. बेकायदा गर्भपातांची संख्या इंग्लंड व वेल्समध्यें दरसाल १,००,००० भरते, ती पुनः वेगळीच! ह्यांतील बहुतेक गर्भपात अविवाहित तरुणींचेच असतात. संतति प्रतिबंधक साधनांचा उपयोग केला म्हणजे गर्भधारणेचा संभव कमी असतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे इंग्लंडमध्यें तरुण व तरुणी ह्यांचेमधील गैरकायदा व्यवहारांचें प्रमाण किती मोठें असेल, ह्याची कल्पना येते. तेथें सध्या विवाहांचे वेळीं वधूचें वय सरासरीनें २५½ वर्षांचें असतें. साधारणतः १५ ते ४५ वर्षांपर्यंत स्त्रियांना मुलें होऊं शकतात, ह्या दृष्टीनें प्रत्येक स्त्रीच्या "उपयुक्त" आयुष्याचा एक तृतीयांश काळ वाया जातो, असा हिशेब आहे. २१ वर्षांखालील तरुण तरुणींस विवाह करण्यापूर्वी आपल्या आईबापांची संमती कायद्यानें मिळवावी लागते, त्याची अडचण दूर करण्यासाठी खोटीं वयें सांगण्याची प्रवृत्ति निर्माण होते.

---

### मधमाशा पाळण्याचा धंदा

धारवाड येथें मधमाशांचें शास्त्रीय संगोपन करून मध गोळा करण्याचें शिक्षण देण्यासाठी एक वर्ग उघडण्यांत आला होता. एक महिन्याच्या शिक्षणक्रमास ८९ विद्यार्थी हजर होते. त्यांत प्राथमिक शाळा शिक्षकांची संख्या बरीच असल्यानें या शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यांपर्यंत होण्यास मदतच होणार आहे.

वर्गांतील अभ्यासक्रमास प्रात्यक्षिकांची जोड देण्यांत आलेली होती. मधमाशांचें संगोपन कसें करावें, त्यांचीं पोळीं कशीं धरावींत याची सप्रयोग माहिती दिली गेली. हा वर्ग सुरू झाल्यानंतर धारवाड व त्याच्या आसपासच्या भागांत २८ पेट्या ठेवून मधमाशा पाळण्याचा उपक्रम लोकांनीं केलेला दिसून आला. या वर्गाचा समारोप करतांना परीक्षा घेण्यांत आली त्यांत ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांना कलेक्टरांच्या हस्तें प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ नुकताच पार पडला.

---

### थोड्या दारूपासून ज्यास्त समाधान

महागाईच्या दिवसांत दारूचा तुटवडा पडतो, त्यावेळीं थोड्या दारूंत जास्तींत ज्यास्त तिचा अंमल चढविण्याची युक्ति म्हणजे रिकाम्या पोटीं सर्व दारु एकदम पिणें, हा आहे असें शास्त्रज्ञ सांगतात. मनुष्याच्या शिरांत वहाणाऱ्या रक्तांत अल्कोहोलचें प्रमाण जितकें अधिक, त्या मानानें मेंदूवर परिणाम ज्यास्त होतो. म्हणून, शरीरांतून अल्कोहोल बाहेर पडण्याचा मार्ग बंद होऊन मेंदूकडे त्याचा जलद पुरवठा झाला, म्हणजे दारू पिण्याचा उद्देश अधिक सफल होतो.

## सर जनार्दन मदन यांची पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि. ला भेट

प्रॉव्हिन्शिअल को. ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, मुंबई, या संस्थेचे मान्यवर अध्यक्ष सर जनार्दन मदन यांनीं शनिवार तारीख २९-४-४४ रोजीं पुणें येथील स्थानिक व जिल्ह्यांतील सरकारी व बिनसरकारी कार्यकर्त्यांची पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँकेंत भेट घेऊन त्यांच्याबरोबर कांहीं महत्वाच्या बाबींवर चर्चा केली. यावेळीं जिल्ह्यांतील एकंदर पन्नास कार्यकर्ते हजर होते.

प्रारंभीं बँकेचे चेअरमन रावसाहेब य. द्. खोले, यांनीं पाहुण्यांचें हार्दिक स्वागत केलें, व बँकेनें गरजू शेतकऱ्यांना निरनिराळया शेतकी कार्यासाठीं दिलेल्या आर्थिक मदतीचा उल्लेख केला व शेतकी सहकारी सोसायटयांचें बाबत बँकेनें अंगिकारलेल्या कार्याचा आढावा घेतला. हा आढावा घेतांना त्यांनीं प्रामुख्यानें पुढील कार्यक्रमांचा उल्लेख केला. (१) तालुकानिहाय सहकारी संस्थांच्या सभा. (२) शेतकीसाठीं लागणाऱ्या उपकरणासाठीं द्यावयाचें कर्ज. (३) सोसायटयांच्या सभासदांच्या कर्जमर्यादेंत वाढ (४) नवीन सोसायटया काढणें व सभासदांची संख्या वाढविणें. (५) शेतकी सोसायटयांच्या सभासदांची आर्थिक पहाणी करणें वगैरे.

धान्य वाटप प्रश्नासंबंधीं, माहिती सांगतांना बँकेचे चेअरमन रा. सा. खोले, यांनीं असें सांगितलें कीं, आपल्या बँकेनें ह्या व्यवहाराबद्दल प्रथमपासूनच काम करण्याची तयारी दाखविली व त्याप्रमाणें कामासही सुरवात केली. परंतु त्याबाबत निरनिराळया नियंत्रणामुळें हें काम समाधानकारक असें होऊं शकलें नाहीं. आज सरकारला सहकारी संस्थांचा उपयोग होईल असें वाटतें. परंतु त्याबाबत त्यांजकडून बँकेकडे कांहीं लिहून आलें नसून बँकेनें या कार्याकडे कांहीं विशिष्ट दृष्टिनें पाहून हें काम पत्करण्याचें कबूल केलें आहे. आजच्या धान्याबाबतच्या बिकट परिस्थितींत सहकारी संस्थांना आज गेल्या २५ वर्षांत जें कार्य केलें नाहीं तें कार्य करण्याची सुसंधि आली असल्यानें बँकेनें हें काम अवश्य घ्यावें या हेतूनें प्रेरित होऊन बँकेनें हें काम अंगावर घेतलें आहे. आज पुणें जिल्ह्यांत सुमारें ५१ संस्थांकडे हें काम येईल व त्यांना लागणारी सर्व मदत बँकेनें देण्याचें कबूल केलें आहे. पुणें शहरांत खुद्द ज्या कन्झुमर्स सोसायटया आहेत त्यांना लागणारा घाऊक माल पुरविण्याचेंहि काम बँकेनें घ्यावें अशाबद्दल सूचना केली गेली परंतु त्याबाबत फारसा उपयोग झाला नाहीं. या धान्य वाटप प्रश्नाबाबत बोर्डाचे सर्व डायरेक्टर्स व बँकेचे अधिकारी त्याचप्रमाणें सहकारी चळवळींतील प्रमुख अशा कार्यकर्त्यांपैकीं प्रि. ध. रा. गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले, प्रो. शं. रा. भागवत, श्री. एस. एल. आपटे वगैरे व्यक्तींच्या सहकार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर सर जनार्दन यांनीं चर्चेस सुरुवात करून आपल्या भेटीचा उद्देश कार्यकर्त्यांना सांगितला व त्यांनीं खालील मुद्यांचे मार्मिक विवेचन केलें. १ सहकारी तत्त्वें व सहकारी संस्थांमधील प्रत्यक्ष कार्य यांचें ज्ञान जास्त प्रसृत करण्याकरितां मुंबईस एक सहकारी कॉलेज, प्रादेशिक मध्यवर्ती केंद्र ठिकाणीं सहकारी शाळा व तालुक्याच्या ठिकाणीं प्राथमिक शाळा काढण्याची योजना. अशा शिक्षण संस्थेची सध्या किती जरूरी आहे हें सर जनार्दन यांनीं दाखवून दिलें. याच चर्चेत श्री. दा. वि. गोखले, श्री. एस. एल. आपटे, श्री. जी. आर. तुळशीबागवाले व प्रि. डी. जी. कर्वे यांनीं प्रश्नोपप्रश्न विचारून भाग घेतला. चर्चेत अशा शिक्षण संस्थेचा सार्वजनिक कार्यकर्त्यांस कितपत उपयोग होणार अशी भीति प्रदर्शित केली गेली, व हें शिक्षण सध्याचें व्यापारी कॉलेज देऊं शकेल तेव्हां त्याचे अभ्यासक्रमांत याचा समावेश करावा असें सुचविलें गेलें. तसेंच शिक्षण कार्यास आर्थिक मदत कोणाची होणार अशी विचारणा केली गेली. यावर सर जनार्दन यांनीं जरूर तीं उत्तरें दिलीं.

यानंतर झालेल्या धान्य वाटप प्रश्नावरील चर्चेत निरनिराळया कार्यकर्त्यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या. प्रो. शं. रा. भागवत यांनीं अल्प वेतनी कामकरी लोकांच्या सहकारी सोसायटयांस या बाबतींत सहन कराव्या लागणाऱ्या अडचणी निवदने केल्या. श्री. दा. वि. गोखले यांनीं धान्य वाटप केंद्रें हीं को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटला जबाबदार रहावींत, परस्पर रेव्हिन्यू खात्यास जबाबदार असूं नयेत, असें स्पष्ट मत निर्भिडपणें प्रकट केलें.

नंतर सहकारी क्षेत्रांत नवें संशोधन करण्याची व मार्केटिंग सोसायटया काढण्याचे आवश्यकतेबद्दल चर्चा झाली. चर्चेत श्री. तुळशीबागवाले, श्री. के. व्ही. जोशी व श्री. अप्पासाहेब भागवत यांनीं प्रामुख्यानें भाग घेऊन आपापले विचार प्रदर्शित केले.

सभेंत उपस्थित झालेल्या कार्यकर्त्यांनीं विचारलेल्या सर्व प्रश्नांना सर जनार्दन यांनीं योग्य तीं उत्तरें दिलीं.

श्री. तुळशीबागवाले यांनीं नंतर पाहुण्यांचे आभार मानले व अल्पोपाहार होऊन सभेचें विसर्जन झालें.

## कऱ्हाड तालुक्यांतील भुईमुगाच्या शेंगा विक्रीस मार्केट ॲक्ट लागू

सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड तालुक्यांत भुईमुगाच्या शेंगाचें फार मोठें पीक आहे. या तालुक्यांतील कऱ्हाड व उंब्रज हीं शेंगा विक्रीचीं मुख्य बाजाराचीं गांवें आहेत. व्यापारी कसर, काटा सूट, धर्मादाय, माती व इतर मिश्रण इत्यादि बाबतींत व्यापारी लोकांकडून मालाच्या विक्रीच्या रकमेंतून रकमा कापून घेण्याची पद्धत असल्यामुळें शेतकऱ्यांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळत नाहीं. अयोग्य रकमा कापल्या जाऊं नयेत व शेतकऱ्यांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळावी या हेतुनें सरकारनें कऱ्हाड व उंब्रज येथील बाजार पेठांना मार्केट ॲक्ट ( सन १९३९ चा ) लागू केला आहे.

मार्केट कायदा व कानूप्रमाणें पहिली मार्केट कमिटी नेमली गेली असून जिल्हाधिपती मि. डी. जी. चेंबर्स आय. सी. एस. यांचे अध्यक्षतेखालीं ता. २९ एप्रिल रोजीं कमिटीची पहिली सभा भरून रावसाहेब कल्याणी यांची चेअरमन म्हणून निवडणूक झाली आहे. मार्केटचा कायदा लागू केल्यापासून शेतकऱ्यांचे व व्यापाऱ्यांचे काय काय फायदे होतील यासंबंधीं तसेंच सदर कायदा व कानूमधील महत्वाच्या कलमांची माहिती सदर सभेंत असिस्टंट रजिस्ट्रार श्री. पाटीलसाहेब व मार्केटिंग इन्स्पेक्टर श्री. सूर्यवंशी यांनीं सांगितली. शेवटीं मार्केट कमिटीच्या कामांत मार्गे लक्ष राहून चालू लढाईच्या व इतर अडचणींच्या काळांत नियंत्रित मार्केटचा व्यापाऱ्यांनीं व शेतकऱ्यांनीं पूर्ण फायदा घ्यावा असा कलेक्टर साहेबांनीं उपदेश केल्यानंतर सभेचें काम संपलें.

## मुं. प्रां. स. इन्स्टिट्यूटच्या चेअरमनची पुणें, बेळगांव व धारवाड येथें भेट व चर्चा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जनार्दन मदन, ह्यांनीं पुणें, बेळगांव व धारवाड ह्या केंद्रांस एप्रिलअखेर व मे चे प्रारंभीं भेटी दिल्या. पुणें येथील भेटीचा वृत्तांत स्वतंत्रपणें दुसरीकडे दिला आहे. बेळगांव येथें जिल्हा सहकारी शिक्षण कमिटीच्या संबंधांत त्यांनीं मार्गदर्शन करून ट्रेनिंग क्लासेस काढणें, एज्युकेशन सुपरवायझरनें व्याख्यानें लिहून काढून त्यांचा उपयोग करणें, कमिटीच्या सभासदांनीं आपल्या आवडीप्रमाणें कामें अंगावर घेणें, इत्यादि गोष्टी सुचविल्या. जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांबरोबर त्यांनीं अनौपचारिक चर्चा केली. "सहकारी सोसायट्यांच्या सभासदांस आपलें धान्य सहकारी मार्केटिंग व सेल संस्थांमार्फत विकावयाचें असल्यास त्यास सरकारची हरकत नसावी, रेव्हेन्यू खात्यास ह्यासंबंधांत लिहिण्यांत यावें, सरकारनें ठरवून दिलेल्या किमान किंमतीचेहि खालीं कपाशीचे भाव गेले आहेत; तेव्हां सरकारनें किमान किंमतीस कपास खरीदण्याबद्दल त्यांस इन्स्टिट्यूटनें लिहावें. सहकारी शिक्षणासाठी कर्नाटक विभागांत एक स्वतंत्र संस्था असावी. एक सहकारी कॉलेज स्थापण्यांत यावें. सहकारी संस्थांमार्फत धान्य वाटणीचें काम करण्याचें ठरलें, तर त्या कामांत पूर्ण सचोटी बाळगली पाहिजे. नाहींतर सहकारी चळवळीस कालिमा येईल." असा त्या चर्चेचा निष्कर्ष आहे. बेळगांव जिल्हा को. इं. असोसिएशनच्या अडचणीहि त्यांनीं समजून घेतल्या व सल्ला दिला.

सहकारी कार्यकर्त्यांची सभा १ मे रोजीं धारवाड येथें सदर्न मराठा अर्बन को. बँकेंत भरली होती, त्या वेळीं सर जनार्दन मदन ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी शिक्षण, कंट्रोल केलेलीं धान्यें व इतर माल ह्यांची वांटणी, इत्यादि प्रश्नांवर आपले विचार व्यक्त करून जिल्ह्यांतील सहकारी प्रगतीचा त्यांनीं आढावा घेतला. कपाशीच्या पडलेल्या बाजारभावासंबंधीं सभेंत चर्चा झाली. सर जनार्दन ह्यांनीं जिल्हा एज्युकेशन कमिटीशीं चर्चा केली व कामाची आंखणीहि केली.

### ऑनररी सेक्रेटरींची अहमदाबादला भेट

जुलैमध्यें इन्स्टिट्यूट अहमदाबाद येथें एक सहकारी वर्ग उघडणार आहे, त्यासंबंधीं चर्चा करण्यासाठीं इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं अहमदाबादला ता. ८ मे रोजीं भेट दिली व अहमदाबाद सें. को. बँकेच्या कचेरींत प्रमुख अशा २० कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून योजना आंखण्यांत आली. वर्गांत प्रवेश कोणास मिळावा, शाळा कोठें भरविण्यांत यावी, शिक्षकांची निवड कशी करावी, सल्लागार मंडळाची नेमणूक कशी करावी व त्यांत कोणास नेमावें, इत्यादि विषयांवर तपशीलवार बोलणीं झालीं, असें समजतें.

### पू. खानदेश जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांची परिषद

श्री. भास्करराव जाधव ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या खानदेश जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांच्या परिषदेची माहिती पू. खा. डि. बोर्ड ऑफ सु. यूनियन्सकडून आमचेकडे प्रसिद्धीसाठीं आली आहे; ती लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. परिषदेंत बरेच उपयुक्त ठराव मंजूर झालेले असून अध्यक्षांचें भाषणहि मार्गदर्शक व उद्बोधक आहे.

## लॉटरीच्या कर्जांची पहिली बक्षीसवाटणी १५ जुलै रोजीं होणार

फाजील चलनवृद्धीस आळा घालण्याचे दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें लॉटरीच्या कर्जांची योजना आखून बाक्षिसाचे रोखे विक्रीस काढले. १५ जानेवारी १९४४ पासून त्यांची विक्री चालू आहे. त्यांच्या नंबरांच्या चिठ्या टाकून बाक्षिसाचे रोखे निवडण्याचें काम १५ जुलै रोजीं बहुधा मुंबई येथें होईल. कर्जरोखे १०० रुपयांचे व १० रुपयांचे अशा स्वरूपांत विकण्यांत येतात व त्यांच्या अनुक्रमें १ कोटि रुपयांचा व १० लक्ष रुपयांचा गट मानण्यांत येतो. प्रत्येक गटांतील रोख्यांच्या नंबरांच्या चिठ्या १५ जानेवारी व १५ जुलै रोजीं एकूण दर सहामाहीस १०० रुपयांच्या रोख्यांचे गटास १ लक्ष रुपयांचीं व १० रुपयांच्या रोख्यांचे गटास १० हजार रुपयांचीं बाक्षिसें जाहीर केलीं जातील. गटांतील सर्व रोखे खपून त्याची खबर मुख्य कचेरीस मिळाली, तरच त्यांतील रोख्यांच्या नंबरांच्या चिठ्या टाकल्या जातील, ह्या अटीमुळें कित्येक लोक रोखे घेण्यास नाखुष असतात. हिंदुस्थान सरकारनें ही अडचण दूर करून ज्यांनीं १८ जून पूर्वी रोखे घेतले असतील, त्यांचे नंबर सबंद गटांतील रोखे खपले नसले तरी, बाक्षिसाचे वाटणीस पात्र होतील, असें जाहीर केलें आहे व बाक्षिसाच्या नंबरास जाहीर केलेलें पुरें बक्षीस देण्यांत येईल, असेंहि सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ह्याचा अर्थ, १८ जून रोजीं रोख्यांची विक्री बंद करण्यांत येऊन तिला पुनः १६ जुलै रोजीं प्रारंभ केला जाईल.

### सुपरवायझर्सचा डिप्लोमा

इन्स्टिट्यूटच्या सेंट्रल एज्युकेशन बोर्डातर्फे घेण्यांत आलेल्या सुपरवायझर्स डिप्लोमा परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या कांहीं उमेदवारांनीं डिप्लोमा मिळविण्यासाठीं पार पाडाव्या लागणाऱ्या कांहीं अटींची माफी मिळण्यासंबंधीं अर्ज केला. इन्स्टिट्यूटच्या एज्युकेशन कमिटीनें ह्या प्रश्नाचा विचार केला व ज्यांनीं किमान पांच वर्षें यूनिअनमध्यें समाधानकारक काम केलें असेल, अशा पास झालेल्या उमेदवारांना डिप्लोमा द्यावा, असें ठरविलें. ह्यासंबंधांत सुपरवायझरांनीं अर्ज करण्याची मुदत ३० जून, १९४४ ही आहे. (१) अर्जदाराचें पूर्ण नांव (२) कोणत्या वर्षी व महिन्यांत कोणत्या केंद्रास बसून परीक्षा पास झाली त्याचा तपशील (३) कोणत्या संस्थांत कामें केलीं त्याची माहिती व (४) यूनिअनच्या चेअरमनचा कामासंबंधीं शेरा, हीं सर्व अर्जांत नमूद केलीं पाहिजेत.

### इन्स्टिट्यूटला देणग्या द्या.

इन्स्टिट्यूटचें फीचें उत्पन्न आतां बरेंच कमी झालें आहे व सभासद वाढविण्याचें क्षेत्रहि आकुंचित झालें आहे. ज्या सहकारी संस्थांना शक्य आहे अशांनीं इन्स्टिट्यूटसारख्या मध्यवर्ती संस्थेस सहाय करणें इष्ट आहे. सहकारी सोसायट्यांना आपल्या नफ्याचा कांहीं भाग मदतीदाखल काढतां येतो व त्याच्या ५ ते १०% रक्कम इन्स्टिट्यूटला देणगी देतां येते. ह्या देणगीस मंजुरी मिळूं शकते. देणगीच्या वार्षिक सदरांतून किंवा त्याच्या फंडांतून सहकारी संस्थांनीं इन्स्टिट्यूटला सढळ हातानें मदत करावी, अशी विनंति करणारें एक पत्र इन्स्टिट्यूटच्या चेअरमननीं सोसायट्या, सेंट्रल बँका, अर्बन बँका व कांहीं महत्त्वाच्या सेल सोसायट्या ह्यांचेकडे पाठविलें आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.